**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 18 अन्वये दाखल तक्रार**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-431001

| बोर्ड क्रमांक : 19 | तक्रार क्रमांक 1738/2019 (द्वितीय अपील क्रमांक :- 1637/2018 ) |
|---|---|

| अक्र. | तपशिल | |
|---|---|---|
| 1 | श्री. अनिल सावळाराम देशमुख,<br>रा. मोगरा ई-5, भुखंड क्र.110 गुरुसहानीनगर, सिडको एन-4, छत्रपती संभाजीनगर | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | |
| 1 | जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी,<br>जल व भुमी व्यवस्थापन संस्था, वाल्मी महाराष्ट्र शासन,पैठण रोड, कांचनवाडी,<br>ता.जि.छत्रपती संभाजीनगर | उत्तरवादी क्र. 1 |

**(सुनावणी दिनांक 30.07.2024)**

तक्रारदार यांनी दिनांक 18.10.2019 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,2005 चे कलम 18 नुसार तक्रार अर्ज दाखल केलेला आहे.

आयोगामध्ये दाखल केलेल्या द्वितीय अपील क्रमांक 1637/2018 यावर आयोगाने दिनांक 16.07.2018 रोजी सुनावणी घेवून पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही केली नाही, अशी विनंती तक्रारदार यांनी आयोगाकडे केलेली आहे.

त्यानुसार सदर तक्रार प्रकरणात आयोगामध्ये दिनांक 30.07.2024 रोजी सुनावणी निश्चित करण्यात आली होती. सदर सुनावणीस तक्रारदार अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी, जल व भुमी व्यवस्थापन संस्था, वाल्मी, कांचनवाडी,ता.जि.छत्रपती संभाजीनगर हे सुनावणीस उपस्थित होते.

प्रस्तुत प्रकरणात आयोगासमोर उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन युक्तीवादावरुन असे स्पष्ट होते की, आयोगाने दिलेल्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केलेला नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी त्यांचे तक्रारीमध्ये नमुद केलेल्या मुद्यामध्ये तथ्यांश असल्याचे दिसून येते.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी, जल व भुमी व्यवस्थापन संस्था, वाल्मी, कांचनवाडी,ता.जि.छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच द्वितीय अपील क्रमांक 1637/2018 यावर आयोगाने दिनांक 16.07.2018 रोजी दिलेल्या ओदशानुसार 15 दिवसात कार्यवाही करुन तक्रारदारास कळवावे. यास्तव तक्रारदार यांची तक्रार यास्तरावर निकाली काढण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहेत.

**आदेश**

उपरोक्त विवेचनावरुन तक्रारदार यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**(मकरंद रानडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र. **तक्रार क्रमांक** 1738/2019 (**द्वितीय अपील क्रमांक** :- 1637/2018 ) डी / 13883 दि. 08/08/2024